# प्रकरण पाचवे

## उपसंहार

# प्रकरण पाचवे

# उपसंहार

श्री. दा. पानवलकरांची 'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट (चिकित्सक अभ्यास) या विषयाचा आढावा घेणे प्रस्तुत लघुप्रबंधाचा हेतू आहे.

साहित्याच्या प्रमुख प्रकारामधील 'कथा' हा लोकप्रिय वाङ्मय प्रकार आहे. तर चित्रपट ही साहित्य, संगीत, चित्र, शिल्प, नृत्य, नाट्य या सर्व कलांच्या मिलाफातून निर्माण होणारी परंतू स्व:चे अस्तित्व प्रस्थापिणारी स्वतंत्र कला आहे. साहित्याच्या प्रमुख प्रकारामधील कथा, कादंबरी, नाटक या वाङमयप्रकारावर आधारित अनेक चित्रपटरुपांतरे झालेली आहेत. चित्रपटरुपांतराची ही संख्या लक्षणीय अशी आहे. याचा थोडक्यात विचार प्रस्तावनेत केलेला आहे. श्री. दा. पानवलकरांची 'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट यांचा अभ्यास करताना कथेचे चित्रपटरुपांतर होताना होणाऱ्या बदलांचा अभ्यास येथे महत्त्वपूर्ण ठरतो. याचा अभ्यास प्रस्तुत लघुप्रबंधात केलेला आहे.

प्रस्तुत लघुप्रबंधात पहिल्या प्रकरणामध्ये **'मराठी कथेचे स्वरूप आणि परंपरा'** याचा अभ्यास केलेला आहे. पाश्चात्य व पौर्वात्य साहित्यिकांच्या व्याख्याद्वारे मराठी कथेचे स्वरूप पाहताना एलिझाबेथ बॉवेन, एच. ई. बेटस्, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, भालचंद्र नेमाडे, गंगाधर गाडगीळ या साहित्यिकांच्या व्याख्या स्पष्ट केलेल्या आहेत. कथाकाराला आलेल्या अनुभूतीला तिच्या विशिष्ट स्वभावधर्मानुसार मिळालेले आविष्काराचे शब्दरूप म्हणजे 'कथा' असे थोडक्यात म्हणता येईल. कथांच्या वैशिष्टांचा अभ्यास करताना अनुभव, कथानक, व्यक्तिरेखा, वातावरण, भाषा, संवाद या अपरिहार्य घटकांमुळेच कथा सिध्द होत असते.

मराठी कथेचा धावता आढावा घेताना लोककथेतून मराठी कथेची झालेली उत्पत्ती वेगवेगळी वळणे घेत विकसित झालेली आहे. अव्वल इंग्रजी कालखंडातील कथा उपदेशपर व बोधपर आहेत. शृंगार व अद्‌भूतरम्यता यांचा तिच्यावर प्रभाव होता. या कालखंडाने भविष्यकाळातील समृध्द, संपन्न कालखंडाची तयारी केली असे म्हणता येईल. 'करमूणक' कालखंडात खऱ्या अर्थाने मराठी कथेला झालेल्या सुरूवातीला 'स्फुटगोष्ट' असे नामकरण हरिभाऊंनी केले. 'पायाभरणीचा कालखंड' म्हणून महत्त्वपूर्ण असणाऱ्या या कालखंडातील हरिभाऊ हे प्रभावी लेखक होय. 'मनोरंजन' कालखंडातील कथा अधिक विकसित झालेली दिसते. याकाळी स्त्रियाही लेखन करू लागल्या. मराठी कथेला नवे वळण मिळून कथा विकसित होऊ लागली. 'यशवंत किर्लोस्कर' कालखंडात मराठी कथेचा उत्कर्ष व भरभराट झालेला दिसतो. 'लघुकथा' या नावाने ओळखली जाणारी ही कथा फडके, खांडेकर हे प्रभावी लेखक होय. विनोदी, प्रादेशिक, रूपक कथा, शब्दचित्रे, लघुत्तमकथा या प्रकारांनी कथेत भर घालून कथाक्षेत्र बहरले. 'सत्यकथा-अभिरूची' कालखंडातील कथेने जुने संकेत झुगारून देणाऱ्या नव्या कथा लिहिल्या. गाडगीळ, गोखले, भावे व माडगूळकर हे नवकथेचे शिल्पकार. यानंतर १९६० नंतरच्या कालखंडातील श्री. दा. पानवलकरांचे स्थान निश्चित केलेले आहे. अशा पद्धतीने मराठी कथेचे स्वरूप आणि परंपरा याची वाटचाल पहिल्या प्रकरणात अभ्यासली आहे.

दुसऱ्या प्रकरणात **'पानवलकरांचे लेखन आणि 'सूर्य' कथा'** याचा अभ्यास केलेला आहे. १९६० नंतरच्या कालखंडातील श्री. दा. पानवलकर हे महत्त्वपूर्ण व सामर्थ्यवान कथाकार आहेत. 'गजगा', 'औदुबंर', 'सूर्य', 'एका नृत्याचा जन्म', 'चिनाब', व 'जांभूळ' या कथासंग्रहाआधारे त्यांच्या कथेचे स्वरूप

व वेगळेपण पाहता कस्टमखात्यातील व्यवसायाशी निगडीत त्यांच्या कथा मराठी वाचकाला अपरिचित जगात नेताना दिसतात. तसेच त्यांच्या काही विनोदी व प्रणयप्रधान कथाही आहेत. जोमदार भाषाशैलीने त्यांची कथा वाचताना एक प्रकारची झिंग येते. पानवलकरांच्या कथांची वैशिष्ट्ये पाहिल्यानंतर 'सूर्य' कथेचा सविस्तर परामर्श घेतलेला आहे. 'सूर्य' कथेत बापाच्या इच्छेखातर मुलाने स्विकारलेला व्यवसाय आणि या व्यवसायातील वातावरणामुळे मुलात झालेला आमूलाग्र बदल पानवलकर जिगरबाज शैलीने व ताक्दीने व्यक्त करतात. कथेची बांधणी, कथानिवेदनाची शैली आणि प्रतिमांची भाषा यातील प्रभावीपणाने 'सूर्य' कथा उत्कृष्ट व श्रेष्ठ ठरते.

**'अर्धसत्य' चित्रपट** या तिसऱ्या प्रकरणात प्रथमतः 'चित्रपट' संकल्पना स्पष्ट केलेली आहे. मानवी समाज केंद्रस्थानी ठेऊन चित्रपटनिर्मिती केल्याने व दृश्यरूपाने प्रत्यक्ष पहायला मिळाल्याने व्यापक स्वरूपात स्पष्ट होणारी चित्रपटकला इतर कलांच्या तुलनेत समष्टीच्या पातळीवर अधिक पोहचते. करमणूकीबरोबर चित्रपट समाजप्रबोधनाचे कार्य करीत असल्याने एक महत्त्वपूर्ण माध्यम म्हणून ओळखले जाते. चित्रपट ही सामूहीक कला असल्याने इतर कलांचा व तंत्रांचा वापर यात केलेला असतो. व या सर्वांच्या सहकार्याने चित्रपटनिर्मिती केली जाते. चित्रपटातील साहित्यिक घटक म्हणजे पटकथा, कथानक, स्वभावरेखन, संवाद, गीत, प्रतीक आणि तांत्रिक घटक म्हणजे दिग्दर्शन, छायाचित्रण, संकलन, संगीत-पार्श्वसंगीत, कलादिग्दर्शन अभिनय हे महत्त्वपूर्ण आहेत. चित्रपटाचा उदय युरोपियन देशात झाला व तेथून चित्रपट भारतात आला. हिंदी चित्रपटाच्या प्रवाहात प्रारंभिक मूक चित्रपट, स्वातंत्र्योत्तर काळातील व्यावसायिक, शृंगारिक व वास्तववादी चित्रपट, समांतर वा कलात्मक चित्रपट या

टप्प्याने अभ्यास केलेला आहे. समांतर चित्रपटात हिंदी चित्रपटातील धांगडधिंगा, नाचगाणी, अवास्तव व भडक चित्रण यांना फाटा देऊन समाजातील वास्तव वा सत्य प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला असतो. यानंतर 'अर्थसत्य' चित्रपटाचा सविस्तर अभ्यास करताना 'अर्धसत्य' हा देखील समांतर पठडीतला हिंदी चित्रपट आहे. 'सूर्य' कथेवर आधारित 'अर्धसत्य' चित्रपटात 'अनंत' या व्यक्तिरेखेला मध्यवर्ती ठेवून त्याच्या मानसिक अवस्थेचे व पोलिसखात्यातील भ्रष्ट व्यवहाराचे चित्रण करताना सामाजिक व राजकीय संदर्भ लाभलेला आहे. या चित्रपटातून काळाच्या ओघात कधीही नष्ट न होणारं सत्य सापडतं ज्याचा संबंध पोलिसदलातील व राजकारणातील भ्रष्टाचाराशी आहे. 'सूर्य' कौटुंबिक कथेवर आधारित 'अर्धसत्य' चित्रपटाला सामाजिक आशय प्राप्त झाल्याने व उपकथानकाच्या जोडीने, साहित्यिक व तांत्रिक घटकांच्या वापराने चित्रपट स्वतंत्र कलाकृती म्हणून मान्यता पावतो.

चौथ्या प्रकरणात **'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट** (वाङ्मयीन अभ्यास) केलेला आहे. यामध्ये प्रथमत: कथा आणि चित्रपट तुलनात्मक अभ्यास करताना कथेचे चित्रपट रूपांतर होताना माध्यमातील फरकामुळे कथेच्या छोट्या आवाक्याचे चित्रपटाच्या प्रदीर्घ अवकाशात रूपांतर करताना बदल घडतात. कथेत भाषालंकारांनी केलेल्या रसभरित लेखनाचे चित्रपट रूपांतरात प्रकाशयोजना, ध्वनिमुद्रण, संगीतयोजना, कॅमेऱ्याच्या सूचक हालचालींचा म्हणजे छायाचित्रणाचा मार्मिक वापर केला जातो. माध्यमातील फरकामुळे 'सूर्य' कथेचे कथानक कथेच्या सूत्रानूसार पुढे सरकत नाही, तर त्यात काही बदल वा तडजोडी केल्या आहेत. त्यामध्ये चित्रपटाच्या सशक्त परिणामासाठी कथानकाचा विस्तार, घटना-प्रसंगातील बदल, व्यक्तिचित्रणात बदल, निवेदन व संवादाचे स्वरूपात बदलांचा अभ्यास, संघर्ष, सामाजिक प्रभाव या घटकांचा वाङ्मयीन अभ्यास केलेला आहे.

प्रस्तुत **'उपसंहार'** या पाचव्या प्रकरणात पहिल्या प्रकरणापासून ते चौथ्या प्रकरणापर्यंतचा स्थूल आढावा घेतलेला आहे व अभ्यासाअंती हाती आलेले निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

**निष्कर्ष**

१. श्री. दा पानवलकरांची 'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट यांच्या चिकित्सक अभ्यास करताना कथेचे आणि चित्रपटाचे कथासूत्र एकच असले तरी कथेचे निवेदन प्रधान गद्य आणि चित्रपटातील हलत्या छायाप्रकाशांची तुकड्यांची मालिका या आविष्काराच्या माध्यमातील फरकामुळे झालेले बदल लक्षणीय स्वरूपाचे आहेत.

२. 'सूर्य' कौटुंबिक कथेच्या छोट्या आवाक्याचा 'अर्धसत्य' चित्रपटात विस्तार करताना सामाजिक व राजकीय संदर्भ लाभलेला आहे.

३. कथेचा कथाबंध चिंतनशील वाचनातून उलगडत जाताना 'सूर्य' कथेतील लेखकाची दणकट भाषाशैली, मर्यादित व्यक्तिरेखा अगदी मोजकेच पण बोलके संवाद व तीव्र अनुभूती याद्वारे अनंतांचा व बापाचा मानसिक संघर्ष व्यक्त करताना कथा मराठीतील श्रेष्ठ व यशस्वी कलाकृती ठरते. एका व्यक्तिमत्त्वाचा होणारा कायापालट निवेदनातून साकार करताना लेखकाची बेदरकार, जिगरबाज शैली प्रकर्षाने दिसते.

४. 'अर्धसत्य' चित्रपटाचा कथाबंध सुस्पष्ट व दृश्यस्वरूपात समोर येताना मूळ कथेचा हेतू तोच ठेऊन आशयास कोणतीही हानी न करता दिग्दर्शकाने केलेला कथानकाचा विस्तार प्रभावी उतरलेला आहे.

५. 'अर्धसत्य' चित्रपटामध्ये मूळ कथेतील घटना प्रसंग, व्यक्तिचित्रणे, संवाद

यांच्या परिपोषाला चित्रपटाचा आकृतिबंध मिळाल्यामुळे अधिक अवसर मिळालेला आहे.

६. चित्रपटाच्या सशक्तीकरणासाठी केलेले बदल दृश्यरुपाने व तांत्रिक कौशल्याद्वारे यशस्वी झाले असले तरी 'सूर्य' कथेतील एका व्यक्तित्वाचा होणारा कायापालट व बाप-मुलगा यांच्यातील मानसिक संघर्ष लेखकाने ज्या जोमदार भाषाशैलीने व घटनांतील प्रचंड वेगाने शब्दरूपाने साकार केलेला आहे तो कथेचा वेग मात्र चित्रपटात उतरलेला नाही.

७. समाजप्रबोधनाच्या दृष्टीने दिग्दर्शकाने केलेला हा रूपांतराचा प्रयत्न लक्षात घेता 'अर्थसत्य' चित्रपट समांतर चित्रपटाच्या पठडीतला एक यशस्वी चित्रपट व मैलाचा दगड ठरतो.

८. कथानुभव व सिनेमाचा अनुभव या दोहोतील अनुभवात 'सूर्य' कथा दृश्यरूपाने व्यापक स्वरूपात स्पष्ट होताना चित्रपट प्रवाहात आपले स्वतंत्र अस्तित्व राखताना दिसते.

९. एकाच अनुभवबीजावर आधारित या कलाकृतींच्या भिन्न माध्यामामुळे आशयावर झालेला परिणामही स्पष्ट होतो.

१०. संप्रेषणात झालेल्या बदलाने केवळ बुध्दिजीवी व सुशिक्षित लोकांना वाचता येणारी 'सूर्य' कथा चित्रपट माध्यमाने दृश्य रुपात निरक्षर लोकांनाही पाहता आल्याने प्रभावी ठरते.

११. एकूणच 'सूर्य' कथा आणि 'अर्धसत्य' चित्रपट यांच्या चिकित्सक अभ्यासाअंती कथेचे चित्रपट रूपांतर होताना या दोन्ही कलाकृतीचे स्वतंत्र अस्तित्व जाणवते.